1190

1190

SARADĀRA Bhagatasiṅgācā povāḍā. Bhāga 1 lā.
Āvṛttī 4 thī.
[Nasik]: Śaṅkara Kavi Varavaṇḍakara, 1931.
4 p. 22 cm.
2 nationalistic ballads, one in praise of Bhagat Singh, the other on Motilal Nehru
PP Mar D 5/2

NATIONAL ARCHIVES OF

PP MDC 512

॥ वंदे मातरम् ॥

— सरदार भगतसिंगाचा —

पोवाडा

प्रकाशक:— शंकर कवि वरवंडकर

भाग १ ला

आवृत्ती ४ थी,

प्रती २००

सन १९३१ इसवी.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

किंमत अर्धा आणा

[हिरे हरपले]

सरदार भगतसिंगाचा पोवाडा.

(चाल:- मावधरारे)

हुतात्मे गेले—दीन दुःख निवारणवाले ॥ धृ० ॥

तो भगतसींग सरदार ।
सुखदेव राजगुरुवीर ॥
घेऊन हातामध्यें शीर ।
लढुनी गेले—दीन दुःख निवारणवाले ॥ १ ॥

हिंददेश वैभवशाली ।
झुरे मान घालुनी खाली ॥
तेव्हां हे आमुचे वाली ।
धांवत आले—दीन दुःख निवारणवाले ॥ २ ॥

पाहुनी दैन्य देशाचें ।
कळवळले हृदय वीरांचे ।
ठरविले कार्य करण्याचें ॥
लढणेवाले—रणरंगणी नाचत आले ॥ ३ ॥

देश भक्तीनें प्रेरित झाले ।
हिंदभूमिचें सेवक बनले ॥
धर्मोद्धारासाठीं लढले ।
कीर्तिवाले—आदर्श संतसम झाले ॥ ४ ॥

परतंत्र भारत भूला ।
करुं स्वतंत्र निश्चय केला
सोडिले घरा दाराला ।
नाहीं भ्याले—मरणास हिम्मतवाले ॥ ५ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सरदार भगतसिंगानीं ।
राजगुरु सुखदेवानीं ॥
अजरामर कीर्ती करूनी ।
फांसी गेले—दीन दुःख निवारणवाले ॥ ६ ॥

कवि शंकर जेलुनी हात ।
बांधवांस विनवी त्वरित ॥
कां बसला आतां स्वस्थ ।
पहा ते—गेले—शूर वीर कांतीवाले ॥ ७ ॥

पंडीत मोतीलाल नेहरूंचा पाळणा

(चाल:- अजि अक्कर हा)

आजी नेहरूजी सोडुनी गेले आपणाला ।
काळानें डाव साधियला ॥ धृ० ॥

महाराष्ट्राचा मुकुटमणी तो गेला ।
हिंदभूस धक्का बसला ॥
हा दुःखाचा पर्वत हो कोसळला ।
कीं सूर्य जसा मावळला ॥
अति दुनियेची कळकळ अतिशय ज्याला ।
तो शूरवीर हारपला ॥
लक्ष्मानें गौरव केला ।
चिन्दर्सेत नंबर पहिला ।
कुशल तो राजनीतीला ।
श्री इंदिरेचा प्रेमी अतिशय झाला ।
कवि शंकर करि वंदन त्याला ॥ १ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

[चाल— मजा देते हैं क्या आर]

मुडदाड बने है यार । ए दारू पीनेवाले ॥ धृ० ॥
जबलगी दारूकी प्यास । तब जावे पिठेके पास ।
लिया पावरेपरका गल्लास । ए उल्लू बननेवाले ॥ १ ॥
जब आयी दारूकी तार । तब निकले पिठेके वधार ।
करे लोकसे तकरार । ए मार खानेवाले ॥ २ ॥
जब मार पडे बेमार । तब गाली देवे यार ।
देखके आया चौकीदार । ए पकड जाने वाले ॥ ३ ॥
पकड गया चौकीपर । रखे खोलीके अंदर ।
सुबू निकाले बहार । मू काला बनानेवाले ॥ ४ ॥
खडा करते हैं जमादार । जब कहे हैंजी सादार ।
दंड हुवे रुपिया दो-चार । चौकीमे बैठनेवाले ॥ ५ ॥
ऐसा दारुबाजका डंका । बजे सब लोकोंमे बाका ।
छीः थू हुवे जाके रुका । घर आकर रोनेवाले ॥ ६ ॥

[चाल— मला मुंबईला जायचे]

आरे गांधीची तकली । शाहूच्या बोकाडी बसली ॥ धृ०
तकली आली देशात । अगदी साध्या वेशांत
आम्ह धूर्तांची बाजारी विकली ॥ १ ॥
तकली चरख्याची पोर । मोठी झाली शिरजोर
झाला मँचेस्टरचा माल नकली ॥ २ ॥
बारीक तकलीची तार । जशी पट्टयाची धार
हिने मल मल साटनि डग कापली ॥ ३ ॥

तिवारी प्रिंटिंग प्रेस नासिक

NATIONAL ARCHIVES OF INDIA